# महाराष्ट्र शासन
# शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
## १७ डॉ.आंबेडकर रोड पुणे विभाग, पुणे-०१

Web:www.jdhepune.info E_mail ID- admin@jdhepune.info

फोन नं.०२०-२६१२७८३३ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.ससं/उशि/पुवि/रु.४३,००० वेनि/प्राचार्य/अशाम/२०२०/2450 दि.०५/११/२०२०

**महत्वाचे/न्यायालयीन प्रकरण**

प्रति,
प्राचार्य/प्राचार्या,
अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,
शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
पुणे/अहमदनगर/नाशिक.

विषय:- मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र.६३४/२०१६
महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल्स असोसिएशन ऑफ नॉन-गव्हर्नमेंट कॉलेजेस विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर.

संदर्भ:- शासन पत्र क्र.न्यायाप्र-२०१७/प्र.क्र.३७९/१७/विशि-१, दि.२९/१०/२०२०.

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल्स असोसिएशन ऑफ नॉन-गव्हर्नमेंट कॉलेजेस यांनी विषयांकीत याचिका दाखल करुन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तरतूदीनुसार वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य पदाची वेतननिश्चिती रु.३७४००-६७००० + एजीपी रु.१००००/- मध्ये किमान रु.४३,०००/- मध्ये करुन त्याप्रमाणे लाभ मिळण्याची मागणी केली. सदरची मागणी मा.उच्च न्यायालयाने दि.०६/०९/२०१९ च्या आदेशान्वये मान्य केलेली आहे.

या आदेशानुसार धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी किती प्राचार्य लाभार्थी ठरतील व त्यासाठी किती वित्तीय भार शासनावर येईल, याबाबतची माहिती शासनाने मागविलेली आहे.

तरी या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील लाभार्थी ठरणाऱ्या प्राचार्यांची माहिती खालील नमून्यामध्ये तयार करुन या कार्यालयाच्या jdhepune@gmail.com या ई-मेलवर (MS-Excel Sheet मध्ये सॉफ्ट कॉपी व पीडीएफ सह) उद्या **दि.०६/११/२०२० रोजी दु.१२.०० वा. पर्यंत** निश्चितपणे सादर करण्याची कार्यवाही दक्षता घेण्यात यावी.

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | प्राचार्यांचे नाव | प्राचार्य पदावरील नियुक्ती दिनांक | दि.३१/१०/२०२०पर्यंत सेवानिवृत्त झालेल्या प्राचार्यांचा सेवानिवृत्ती दिनांक | प्राचार्य नियुक्तीच्यावेळी निश्चित करण्यात आलेले मूळ वेतन (वेतन+एजीपी) | प्राचार्य पदी नियुक्ती दिनांकापासून ते ३१/१०/२०२० पर्यंत अदा केलेल्या वेतनाची रक्कम रु. (Drawn) | प्राचार्य पदी नियुक्ती दिनांकापासून रु.४३०००/- या किमान वेतनावर लाभ द्यावयाचा झाल्यास देय वेतनाची अंदाजित रक्कम रु. (Due) | निव्वळ देय रक्कम (८-७) (Difference)/ (एकूण आर्थिक भार रु.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

उक्त न्यायालयीन प्रकरणाची तातडी विचारात घेऊन विहीत कालावधीत माहिती या कार्यालयास सादर होईल, याची दक्षता घ्यावी.

(डॉ.मोहन खताळ)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग पुणे १.

प्रत:- मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीसाठी सविनय सादर.